# शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचे कार्यालय

१७, डॉ.आंबेडकर मार्ग, लाल देवळासमोर, पुणे -१

दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१२५६९६ फॅक्स क्रमांक ०२०-२६१२२२१७

ई मेल आय.डी.क्रं *dydpune@gmail.com* वेब साईट क्रमांक *www.dydepune.com*


कालमर्यादीत

जा.क्र.उमाशि-२/शि.मा./पुवि/१४-१५/२१३२३

दिनांक : २१/१०/२०१५

प्रति

प्राचार्य,

सर्व उच्च माध्यमिक विद्यालय/ सर्व कनिष्ठ महाविद्यालय,

पुणे / सोलापूर / अहमदनगर.

विषय :- कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक/शिक्षण सेवक वैयक्तीक मान्यता शिबीर आयोजनाबाबत...

संदर्भ :- १) शा.नि.क्रं.संकीर्ण-१०९९/(२५५/९९)/माशि-२/ दिनांक ६/९/१९९९

२) शा.नि.क्रं.एसएसएन-१००७/(३६५/०७)/माशि-२/ दिनांक ६/२/२०१२

३) शा.नि.क्रं.संकीर्ण-२०१२/(२०९/१२)/प्राशि-२/दिनांक ६/९/२०१२

४) मा. शिक्षण संचालनालयाकडील क्रं. एचएससी/१५२०११/३१५५४/१२एचएस /३०४८ दिनांक २५/३/२०१२

५) शा.नि.क्रं.एसएसएन-१००८/(२००/०८)/माशि-२/दिनांक २३/१०/२०१३

६) शा.नि.क्रं.एसएसएन-२०१४/(१/१४)/टिएनटी-२/ दिनांक २०/६/२०१४

७) शा.नि.क्रं.एसएसएन-२०१४/(१/१४)/टिएनटी-२/ दिनांक १९/७/२०१४

८) शा . नि . क . संकीर्ण-२०११/(४४७/११)/(अ)प्राशि-३ दिनांक ०२/०५/२०१२

९) मा . शिक्षण संचालक (माध्य व उच्च माध्य) महाराष्ट्र राज्य पुणे यांचे समवेत राज्य शिक्षण संघटना यांच्या सोबत झालेली सहविचार सभा दिनांक १९.१०.२०१५

वरील संदर्भीय विषयानुसार शासनाच्या वेळोवेळी निर्गमित झालेल्या परिपत्रके व शासन निर्णय दिनांक ६/९/२०१२ अन्वये दिनांक २ मे २०१२ च्या शासन निर्णया नंतर भरती प्रक्रियेस असलेली बंदी शासन निर्णय दिनांक २०/६/२०१४ अन्वये उठविण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने कनिष्ठ महाविधालयातील शिक्षक/शिक्षण सेवक वैयक्तिक मान्यता प्रस्तावांना मान्यता देण्याबात शिबीराचे आयोजन खालील वेळापत्राकानुसार करण्यात येत आहे .

२ मे २०१२ पूर्वीच्या या कार्यालयाचे ना हरकत प्रमाणपत्र घेंऊन विहित कार्यपध्दतीने नियुक्त केलेल्या शिक्षकांना तसेच २ मे २०१२ नंतर नियुक्त शिक्षकांच्या मान्यतासाठी काही संस्थांना शासनाने दिलेल्या परवानगीनुसार माहे डिसेंबर २०१३ मध्ये शिक्षक -शिक्षकेतर कर्मचारी मान्यता नस्ती मध्ये शाळा / संस्था यांचेकडून त्रुटींची पूर्तता करून प्रस्ताव शिबीरामध्ये सादर करण्यात यावेत .

संस्था प्रमुख व प्राचार्य यांचे प्रस्ताव सदर शिबिरात सादर करण्याबाबतचे मुद्दे खालीलप्रमाणे.

१. पुर्णवेळ, अर्धवेळ, प्रतिघडयाळी तास तत्वावरील नियुक्त केलेल्या शिक्षकांचा मान्यतेचा प्रस्ताव आपणास नेमून दिलेल्या तारखेस दुपारी १२.०० पूर्वी शिबिरात सादर करणे आवश्यक आहे.
२. या पूर्वीच्या शिक्षक मान्यता शिबीरात प्राप्त झालेल्या प्रस्तावातील आक्षेप संबंधित कनिष्ठ महाविद्यालये/ उच्च माध्यमिक बिदयालयांना कळविलेले आहेत. सदर आक्षेपांची पूर्तता होत असेल तरच या शिबिरात प्रस्ताव सादर करावा. अपूर्ण प्रस्ताव सादर होणार नाही याची दक्षता संस्था प्रमुख/प्राचार्यांनी घ्यावी.
३. शिबीराच्या वेळापत्रकाप्रमाणेच परिपूर्ण प्रस्ताव शिबिरात दाखल करुन निर्णय प्राप्त करुन घ्यावेत. शेवटच्या दिवशी अनावश्यक गर्दी करणे टाळण्यात यावी.

४. प्रस्ताव जाणकार लिपीकाबरोबरच शिबिरात सादर करावा. प्राचार्यांनी शिबीरात उपस्थित राहणे आवश्यक आहे. संबंधित शिक्षक किंवा अन्य कर्मचारी यांना शिबीराससाठी पाठवू नये याची नोंद घ्यावी.
५. शिबिरात नियुक्त शिक्षकासोबत मान्यतेचा प्रास्ताव दाखल केल्यास त्याची गंभीर दखल घेतली आईल.
६. या शै. वर्षातील हे शेवटचे शिक्षक मान्यता शिबीर असल्याने शिबीराचा कालावधी संपल्यानंतर प्रस्ताव कार्यालयात दाखल करु नयेत. त्याची दखल घेतली जाणार नाही. याची नोंद घ्यावी
७. शिक्षण उपसंचालक यांना अचानक उद्‌भवलेल्या अन्य महत्त्वाच्या कामामुळे शिबीरात उपस्थित राहाता आले नाही तर सदर दिवशी दाखल झालेल्या प्रस्तावावर निर्णय कोणत्या तारखेस मिळेल याची माहिती शिबिरात दिली जाईल.
८. शासन निर्णय २ मे २०१२ पुर्वी नियमानुसार ना हरकत प्रमाणपत्र मिळालेले प्रस्ताव सादर करावे .
९. शासन निर्णय २ मे २०१२ पुर्वी नियमानुसार ना हरकत प्रमाणपत्र न मिळालेले प्रस्ताव सादर करावे .
१०. आजपर्यंत आपल्याकडे प्रलंबीत असलेले प्रस्ताव विचाराधीन ठेवले जातील .
११. मुल्यांकनासाठी मान्यता देणे आवश्यक असलेले सर्व कायम विनाअनुदानीत, विना अनुदानित व अंशतः आनुदानित कनिष्ठ महाविद्यालय यांचे प्रस्ताव .
१२. चालू शैक्षणिक वर्षात जाहिरातीसाठी परवानगी हवी असलेल्या सर्व प्रस्ताव सादर करावे .
१३. सेवा निवृत्ती व अन्य कारणास्तव रिक्त झालेल्या पद भरणेसाठी **NOC** हवी असलेले सर्व प्रस्ताव सदर करावे . ते मा . विभागीय आयुक्त पुणे विभागा यांच्या समिती पुढे **NOC** साठी ठेवले जातील .
१४. संच मान्यता २०१४-१५ मध्ये अर्धवेळ मंजूर पदामधून पुर्ण वेळ पद प्रस्तावीत होत असल्यास सदर मंजूर अर्धवेळ पादावरील नियुक्त शिक्षकाचे अर्धवेळ पदाचे वेतन अदा करण्याचे शासन आदेश असल्याने अशा शिक्षकांचेही प्रस्ताव शिबीरामध्ये मान्यतेसाठी सादर करावेत .

मुद्दा ८ ते १४ कमांकामध्ये शासन नियमाप्रमाणे नियुक्त केलेल्या शिक्षक/शिक्षण सेवक यांच्या प्रस्तावांवर योग्य कार्यवाही होईल . तसेच मा . विभागीय आयुक्त पुणे विभाग पुणे यांचेकडे गठीत करण्यात आलेल्या समिती कडे सादर केले जातील . मान्यता प्रस्तावासोबत कागदपत्रे शासन निर्णय दिनांक ६ फेब्रुवारी २०१२ नुसार जोडणे आवश्यक आहेत .

मा . सहाय्यक आयुक्त, मागास वर्गीय कक्ष यांचे कडून तपासलेले रोस्टर जोडणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी . वरील बाबींचे काटेकोर पणे पालन करुन परिपूर्ण प्रस्ताव शिबिरात दाखल करणे व मान्यता प्राप्त करुन घेणे याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित प्राचार्यांची राहील.

**शिबीराचे वेळापत्रक**

**वेळ :- सकाळी १० ते दुपारी 2 . 00**

**दुपारी २.३० ते ५.००**

| अ. क्र. | दिनांक | स्थळ | तालूके/शहर |
|---|---|---|---|
| १. | २६.१०.२०१५ | जंगली महाराज कनिष्ठ महाविद्यालय कोकमठाण जि . अहमदनगर | कोपरगांव, संगमनेर, रहाता |
| २. | २७.१०.२०१५ | बोरावके महाविद्यालय श्रीरामपूर जि . अहमदनगर | श्रीरामपूर, अकोला, राहूरी, नेवासा |
| ३. | २८.१०.२०१५ ते २९.१०.२०१५ | सारडा कॉलेज, अहमदनगर | अहमदनगर तालूका, जामखेड, कर्जत, श्रीगोंदा, शेवगांव पाथर्डी , पारनेर |
| ४. | ३०.१०.२०१५ ते | बी . एम . सी . सी कॉलेज पुणे | पुणे शहर, मावळ, भोर, वेल्हा, मुळशी |

| | | | |
|---|---|---|---|
| | ३१.१०.२०१५ | | |
| ५. | ०२.११.२०१५ ते ०३.११.२०१५ | विद्या प्रतिष्ठान महाविद्यालय बारामती जि . पुणे | बारामती दौंड इंदापुर पुरंदर |
| ६. | ०४.११.२०१५ | अण्णासाहेब आवटे महाविद्यालय मंचर ता . अंबेगाव जि . पुणे | खेड, जुन्नर, आंबेगाव, शिरूर |
| ७. | ०५.११.२०१५ ते ०६.११.२०१५ | वालचंद कॉलेज, सोलापूर | दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर, अक्कलकोट, मोहोळ, बार्शी |
| ८. | ०८.११.२०१५ ते ०९.११.२०१५ | कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर, जि . सोलापूर | पंढरपूर, मंगळवेढा, सांगोला, माळशीरस, माढा. |
| ९ | १०.११.२०१५ | बी . एम . सी . सी कॉलेज पुणे | पुणे विभागातील उर्वरित क . म . वि चे प्रस्ताव (पुणे, अहमदनगर, सोलापूर) |

सदरचे परिपत्रक या कार्यालयाच्या www.dydepune.com संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे.

(रामचंद्र जाधव)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१

O/C
२१/१०/२०१५

प्रत माहितीसाठी सविनय सादर -

१. मा . प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई .
२. मा . विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे .
३. मा . आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे .
४. मा. शिक्षण संचालक ( माध्य व उच्च माध्य ) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. मा . उप संचालक, सामाजिक व न्याय विभाग, पुणे .

प्रत योग्य कार्यवाहीसाठी

१. शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, पुणे/सोलापूर/अहमदनगर
/- यांनी शिबीराचे वेळापत्रक व ठळक मुद्दे या बाबींना आपल्या जिल्हयांच्या स्थानिक वर्तमान पत्रात प्रसिध्दी देण्यात यावी.

२. प्राचार्य , संबंधीत शिबीर कार्यालय .
/- यांनी शिक्षक मान्यता शिबीराच्या वेळी आवश्यक त्या भौतिक सुविधा उपलब्ध करुन दयाव्यात.